। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १०८ वा । शुक्रवार दिनांक ०३ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### घरातील चांदीचे दागिने व रोख रकमेची चोरी

लोहारा (प्रतिनिधी)- लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शंकर बळीराम कापसे, वय ५८ वर्षे, रा. खेड ता. लोहारा जि. धाराशिव यांचे घराचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि. ३०.०६.२०२६ रोजी कापून घरातील चांदीचे दागिने व रोख रक्कम ३०,००० असा एकुण ३३,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शंकर कापसे यांनी दि.०१.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन लोहारा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१ (४), ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव बसस्थानकातून बसमध्ये चढताना सोन्याचे दागिने चोरले

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी गंगाबाई मारुती संकपाळ, वय ६७वर्षे, रा. झरेगाव (पोस्ट चिलवडी) ता. जि. धाराशिव या दि.३०.०६.२०२६ रोजी बसस्थानक धाराशिव येथे धाराशिव वैराग बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून गंगाबाई संकपाळ गळ्यातील ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण २५,०००किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गंगाबाई संकपाळ यांनी दि.०१.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

## आषाढी वारी २०२६ : जिल्ह्यातून चार पालख्यांचे मार्गक्रमण; प्रशासनाकडून नियोजन पूर्ण



धाराशिव दि.१ जुलै (जिमाका) आषाढी वारी पालखी सोहळा २०२६ च्या पार्श्वभूमीवर श्री गजानन महाराज पालखी, श्रीमत संत एकनाथ महाराज पालखी,श्री क्षेत्र मुक्ताईनगर पालखी आणि श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान,कोंडण्यापूर (जि.अमरावती-विदर्भ) पालखी या पालख्या जिल्ह्यातून विविध मार्गांनी मार्गस्थ होणार आहेत.

या पालख्यांच्या मार्गक्रमणासाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक नियोजन केले असून,पालख्यांचे आगमन,विसावा व मुक्कामाचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.मात्र,आवश्यकतेनुसार या वेळापत्रकात बदल होऊ शकतो,असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**श्री गजानन महाराज पालखीचा मार्ग**

१२ जुलै २०२६ : कळंब शहर आगमन व रात्री मुक्काम.१३ जुलै २०२६ : गोविंदपूर येथे विसावा व तेरणा साखर कारखाना येथे मुक्काम.१४ जुलै २०२६ : किणी येथे विसावा व उपळा येथे मुक्काम.१५ जुलै २०२६ : धाराशिव शहरात आगमन.संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर येथे विसावा व लेडीज क्लब येथे मुक्काम.१६ जुलै २०२६ : वडगाव (सि.) येथे विसावा व तुळजापूर येथे मुक्काम.१७ जुलै २०२६ : सांगवी येथे विसावा घेऊन सोलापूर जिल्ह्याकडे प्रस्थान.

**श्रीमत संत एकनाथ महाराज पालखीचा मार्ग**

१६ जुलै २०२६ : अंतरवली येथे विसावा, तित्रज येथे विसावा व दांडेगाव येथे मुक्काम.१७ जुलै २०२६ : देवगाव येथे विसावा,खंडेश्वरी येथे विसावा,रत्नापूर येथे विसावा व आनाळा येथे मुक्काम.

१८ जुलै २०२६ : कंडारी येथे विसावा,पाचपिंपळे येथे विसावा, पिंपरखेड येथे विसावा व परंडा येथे मुक्काम.१९ जुलै २०२६ : परंडा येथे विसावा.

**श्री क्षेत्र मुक्ताईनगर पालखीचा मार्ग**

१५ जुलै २०२६ : पारगाव येथे मुक्काम. १६ जुलै २०२६ : येसवंडी येथे विसावा व वाकवड येथे मुक्काम.१७ जुलै २०२६ : भूम येथे विसावा व भूम येथेच मुक्काम. १८ जुलै २०२६ : आष्टा येथे विसावा, जवळा येथे मुक्काम व त्यानंतर सोलापूर जिल्ह्याकडे प्रस्थान.

**श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कोंडण्यापूर (विदर्भ) पालखीचा मार्ग**

१४ जुलै २०२६ : कळंब शहरात आगमन व मुक्काम.१५ जुलै २०२६ : कन्हेरवाडी (ता.कळंब) येथे मुक्काम.१६ जुलै २०२६ : सकाळी पानगाव येथे विसावा, दुपारी येरमाळा येथे विसावा,त्यानंतर उमरी फाटा येथे विसावा घेऊन सोलापूर जिल्ह्याकडे प्रस्थान करणार आहे.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विविध मार्गांवर मोठ्या संख्येने वारकरी सहभागी होणार असल्याने संबंधित यंत्रणांनी आवश्यक सुविधा,वाहतूक नियोजन,सुरक्षा व्यवस्था आणि मूलभूत सोयींची तयारी केली आहे. तसेच पालखी मार्गावरील नागरिकांनी आणि वाहनचालकांनी प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## धाराशिवच्या लेकीचा राज्यस्तरीय गौरव! सौ. प्रतिभा रामराव काळे यांना 'जिजामाता कृषी भूषण पुरस्कार'




धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)- हरित क्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिनाच्या औचित्याने मुंबई येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियममध्ये आयोजित राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्यात धाराशिव जिल्ह्यातील फनेपूर (ता. धाराशिव) येथील सौ. प्रतिभा रामराव काळे यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'जिजामाता कृषी भूषण पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

हा पुरस्कार राज्यपाल मा. जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सोहळ्यास मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई पवार, कृषिमंत्री मा. दत्तात्रय भरणे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

धाराशिवच्या लेकीने आपल्या कर्तृत्वाच्या बळावर मिळविलेला हा राज्यस्तरीय सन्मान संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली असून, कृषी क्षेत्रात कार्यरत महिला शेतकऱ्यांसाठी तो प्रेरणादायी ठरणार आहे. विशेष म्हणजे, पुरस्कारप्राप्त सौ. प्रतिभा रामराव काळे या भाजपचे मराठवाडा संयोजक श्री. नितीन काळे यांच्या मातोश्री आहेत.

## माजी मुख्यमंत्री नाईक यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी



धाराशिव (प्रतिनिधी) - महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, हरित क्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईक यांच्या ११३ वी जयंती विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून दि.१ जुलै रोजी साजरी करण्यात आला.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, हरित क्रांतीचे जनक यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौकात पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम, वृक्षारोपण रक्तदान शिबिर तसेच शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी ५० जणांनी रक्तदान केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते नाईक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन केले.

या कार्यक्रमास समाजसेवक. डॉ. काकासाहेब राठोड, बालाजी राठोड, मोहन राठोड, विशाल जाधव, अरुण राठोड, युवराज राठोड, नितीन राठोड, वसंत राठोड, बाबू राठोड, रोहिदास आडे, महादेव पवार, शंकर राठोड, गणपत राठोड आदींसह पुरुष व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भूकंपाच्या धक्क्यांबाबत अफवांवर विश्वास ठेवू नका ; प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

### जिल्ह्यात भूकंप झाल्याची अधिकृत नोंद नाही

धाराशिव,दि.२ जुलै (जिमाका ) जिल्ह्यात आज गुरुवारी २ जुलै रोजी सकाळी काही भागांत भूगर्भातून गूढ आवाज ऐकू आल्याने तसेच भूकंपासदृश धक्का जाणवल्याच्या माहितीची जिल्हा प्रशासनाने तत्काळ दखल घेत राष्ट्रीय भूकंपविज्ञान केंद्राकडून याबाबतची पडताळणी केली.

राष्ट्रीय भूकंपविज्ञान केंद्राकडून करण्यात आलेल्या तपासणीनुसार,हिंगोली जिल्ह्यातील औंढा तालुक्यातील कामटी तांडा येथे आज सकाळी १०.१४ मिनिटांनी ३.५ रिश्टर स्केल इतक्या तीव्रतेचा भूकंप झाला होता.धाराशिव जिल्ह्यात काही नागरिकांना जाणवलेला गूढ आवाज हा हिंगोली जिल्ह्यात झालेल्या या भूकंपाचा परिणाम असू शकतो,अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.दरम्यान,धाराशिव जिल्ह्यात भूकंपाची कोणतीही अधिकृत नोंद झालेली नसल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की,अशा घटनांबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.केवळ प्रशासनाकडून अधिकृतपणे जारी करण्यात येणाऱ्या सूचना व माहितीलाच प्राधान्य द्यावे आणि त्याचे पालन करावे.

## धाराशिव आरटीओचे जुलै ते डिसेंबर २०२६ कालावधीतील तालुकास्तरीय शिबिरांचे वेळापत्रक जाहीर

धाराशिव (जिमाका) महाराष्ट्र शासनाच्या मोटार वाहन विभागांतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,धाराशिव यांनी जिल्ह्यातील नागरिकांच्या सोयीसाठी जुलै ते डिसेंबर २०२६ या कालावधीत तालुकास्तरीय शिबिर कार्यालयांचे दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

हा दौरा कार्यक्रम परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या दि.२६ नोव्हेंबर २०१४ रोजीच्या परिपत्रक तसेच कार्यालयाच्या कार्यालयीन दि. ३१ डिसेंबर २०२५ च्या आदेशाच्या अनुषंगाने निश्चित करण्यात आला आहे.

शिबिर कार्यालयांमध्ये वाहन नोंदणी, शिकाऊ अनुज्ञप्ती (Learner Licence), पक्की अनुज्ञप्ती (Driving Licence) आदी सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.शिबिरातील कामकाज हे कार्यालयीन आदेशमधील तरतुदींनुसार मोटार वाहन निरीक्षक व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांनी पार पाडायचे असून,अनुज्ञप्ती संदर्भातील कामकाज निश्चित करण्यात आलेल्या अपॉइंटमेंट कोट्यानुसारच करण्यात येणार आहे.

तसेच शिबिराच्या ठिकाणी CFRA, RMA, बस वाहन नोंदणी आदी कामकाज करण्यात येणार नसल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. शिबिर कार्यालयात प्राप्त होणारे अनुज्ञप्ती व वाहन नोंदणी अर्ज संबंधित नोंदवहीसह ४८ तासांच्या आत सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या स्वाक्षरीसाठी सादर करणे बंधनकारक राहणार असून, विलंब झाल्यास संबंधित शिबिरात नियुक्त अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल,असा इशाराही देण्यात आला आहे.

तालुकानिहाय शिबिरांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे :

उमरगा : प्रत्येक महिन्यातील पहिला, दुसरा, तिसरा व पाचवा मंगळवार.जुलै : ७,१४,२१.
ऑगस्ट : ४,११,१८.सप्टेंबर : १,८, १५,२९.ऑक्टोबर : ६,१३,१९.
नोव्हेंबर : ३,१०,१७.डिसेंबर : १, ८, १५, २९ असे आहेत.

नळदुर्ग (तुळजापूर) : प्रत्येक महिन्यातील दुसरा व चौथा बुधवार
जुलै : ८, २२.ऑगस्ट : १२, २६
सप्टेंबर : ९,२३.ऑक्टोबर : १४,२८
नोव्हेंबर : ११,२५.डिसेंबर : ९,२३

परंडा : प्रत्येक महिन्यातील दुसरा व चौथा गुरुवार.जुलै : ९,२३.ऑगस्ट : १३,२७.
सप्टेंबर : १०,२४. ऑक्टोबर : ८,२२.
नोव्हेंबर : १२, २६,डिसेंबर : १०,२४.

लोहारा : प्रत्येक महिन्यातील तिसरा शुक्रवार.जुलै : १७,ऑगस्ट : २१,
सप्टेंबर : १८,ऑक्टोबर : १६.
नोव्हेंबर : २०,डिसेंबर : १८.

भूम : प्रत्येक महिन्यातील तिसरा गुरुवार.
जुलै : १६,ऑगस्ट : २०,
सप्टेंबर : १७,ऑक्टोबर : १५
नोव्हेंबर : १९,डिसेंबर : १७.

वाशी : प्रत्येक महिन्यातील तिसरा बुधवार.
जुलै : १५,ऑगस्ट : १९
सप्टेंबर : १६,ऑक्टोबर : २१
नोव्हेंबर : १८,डिसेंबर : १६

कळंब : प्रत्येक महिन्यातील दुसरा व चौथा सोमवार.जुलै : १३,२७, ऑगस्ट : १०, २४,सप्टेंबर : १४,२८, ऑक्टोबर : १२,२६,नोव्हेंबर : ९,२३,डिसेंबर : १४,२८ असा आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या तालुक्यातील नियोजित शिबिरांचा लाभ घेऊन वाहन नोंदणी,शिकाऊ अनुज्ञप्ती व पक्की अनुज्ञप्ती आदी कामे वेळेत पूर्ण करून घ्यावीत, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे.

## धाराशिवच्या निर्यातीला नवी गती; पायाभूत सुविधांवर भर देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

### निर्यातीत वर्षभरात ३५.७० कोटींची वाढ; 'फायटोसॅनिटरी लॅबोरेटरी', गुणवत्ता तपासणी केंद्र व कोल्ड स्टोरेज उभारणीवर भर



धाराशिव (जिमाका) -जिल्ह्यातील स्थानिक उद्योग आणि कृषी उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत अधिक सक्षम स्थान मिळावे,तसेच जिल्ह्याच्या निर्यातीला अधिक चालना मिळावी,यासाठी पायाभूत सुविधा उभारणीवर विशेष भर देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

जिल्हा निर्यात प्रचालन समिती (DEPC) ची महत्त्वपूर्ण बैठक २९ जून २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात श्री.पुजार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.या बैठकीत सन २०२६-२७ साठी तयार करण्यात आलेल्या जिल्हा निर्यात कृती आराखड्यावर (Export Action Plan) सविस्तर चर्चा करण्यात आली.बैठकीच्या प्रारंभी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव अमोल बळे यांनी जिल्हाधिकारी व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.त्यानंतर हर्षल पटनी यांनी सन २०२६-२७ या वर्षासाठीचा जिल्हा निर्यात कृती आराखडा सादर केला.

**वर्षभरात निर्यातीत ३५.७० कोटी रुपयांची वाढ**

आराखडा सादर करताना देण्यात आलेल्या माहितीनुसार, धाराशिव जिल्ह्यातून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ७७.९५ कोटी रुपयांची निर्यात झाली.विशेष म्हणजे,सन २०२४-२५ च्या तुलनेत निर्यातीत ३५.७० कोटी रुपयांची लक्षणीय वाढ नोंदविण्यात आली आहे.जिल्ह्यातून प्रामुख्याने रिफाईंड शुगर,कच्ची साखर,केमिकल्स आणि सोयाबीन मील या उत्पादनांची निर्यात होत असून,त्याचबरोबर केळी आणि द्राक्षे यांचीदेखील काही प्रमाणात निर्यात केली जात आहे.

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी वाढत्या निर्यातीच्या पार्श्वभूमीवर भविष्यात विद्यमान उत्पादनांसोबतच इतर उच्च क्षमता असलेल्या उत्पादनांच्या निर्यातीसाठी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले.

जिल्ह्यातील बहुतांश निर्यात उत्पादने ही कृषीआधारित (Agro-based) असल्याने कृषी उत्पादनांवर व्हॅल्यू डिशन (Value Addition) करण्यावर विशेष भर देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.तसेच निर्यातक्षम उत्पादनांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी जिल्ह्यात फायटोसॅनिटरी लॅबोरेटरी (Phytosanitary Laboratory), गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा आणि कोल्ड स्टोरेज उभारण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.यासाठी नव्याने विकसित होणाऱ्या वडगाव (सिं.) एमआयडीसी परिसरात जागा राखीव ठेवण्याबाबत एमआयडीसीच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका दर्शविल्याची माहितीही बैठकीत देण्यात आली.

बैठकीत डीजीएफटी (DGFT) चे प्रतिनिधी श्री.कोकणे यांनी शासनाच्या विविध निर्यात प्रोत्साहन योजनांची माहिती दिली. जिल्ह्यात निर्यात वाढीस चालना देण्यासाठी लवकरच 'एक्सपोर्ट आउटरिच' कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय पायाभूत सुविधांतील त्रुटी, गुणवत्ता मानके आणि बाजारपेठेतील अडचणी दूर करण्यासाठी समन्वयाने उपाययोजना करण्यावर सर्व सदस्यांचे एकमत झाले. मध्यस्थांऐवजी थेट निर्यातीचे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे यांनी केले.

जिल्ह्यातील उद्योजक व एमएसएमई (MSMEs) घटकांना मध्यस्थांमार्फत निर्यात करण्याऐवजी स्वतः थेट निर्यात करण्याचे आवाहन केले.असे केल्यास शासनाच्या विविध निर्यात प्रोत्साहन व अनुदान योजनांचा लाभ उद्योजकांना थेट आणि अधिक प्रभावीपणे मिळू शकणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील प्रमुख कृषी उत्पादनांची निर्यात अधिक वृद्धिंगत करण्यासाठी औद्योगिक संघटना आणि उद्योजकांनी पुढाकार घ्यावा,असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी केले. भविष्यात धाराशिव जिल्ह्याची निर्यात परिसंस्था (Export Ecosystem) अधिक सक्षम करण्यासाठी, उद्योजकांना आवश्यक पाठबळ देण्यासाठी आणि जिल्ह्याच्या निर्यातीस दीर्घकालीन गती देण्यासाठी ठोस रोडमॅप तयार करण्यावर या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले.

# हवामानाधारित फळपिक विमा योजनेत सहभागासाठी 'फार्मर आयडी' अनिवार्य ; मोसंबीसह ७ पिकांसाठी १४ जुलैपर्यंत मुदत

धाराशिव (जिमाका) –हवामानातील अनिश्चितता,कमी पाऊस, पावसाचा खंड,वाढते तापमान आणि सापेक्ष आर्द्रतेमुळे होणाऱ्या नुकसानीपासून फळबागांचे संरक्षण करण्यासाठी राज्य शासनाच्या हवामानाधारित फळपिक विमा योजना २०२६ अंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यंदाच्या मृग बहार हंगामासाठी मोसंबी, चिकू,डाळिंब,पेरू,सिताफळ,द्राक्ष (क), हळद आणि लिंबू या पिकांचा योजनेत समावेश करण्यात आला असून,बहुतांश पिकांसाठी विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत १४ जुलै २०२६ तर सिताफळ पिकासाठी ३१ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

ही योजना कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असून,बिगर कर्जदारांसाठी ती ऐच्छिक आहे.मात्र, कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास संबंधित अधिसूचित पिकासाठी नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस आधी संबंधित बँकेत विमा हप्ता कपात न करण्याबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.अन्यथा अशा शेतकऱ्यांचा योजनेतील सहभाग बंधनकारक मानला जाईल.योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य आहे. बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी अर्जासोबत आधार कार्ड,७/१२ उतारा,फळबागेचा अक्षांश –रेखांशासह फोटो आणि बँक पासबुकची प्रत जोडणे आवश्यक आहे.

यंदापासून ग्रीस्टॅकअंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक (ऋग्रीशी खऊ) बंधनकारक करण्यात आला असून, ऋग्रीशी खऊ शिवाय विमा योजनेत सहभाग नोंदविता येणार नाही.तसेच पीक व फळपिक विमा योजनेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याने ई–पीक पाहणीमध्ये नोंद केलेली असणे आवश्यक आहे.ई–पीक पाहणीतील नोंद आणि विमा उतरविलेल्या पिकामध्ये विसंगती आढळल्यास संबंधित विमा अर्ज रद्द केला जाणार असल्याने शेतकऱ्यांनी याची विशेष दक्षता घ्यावी,असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

**पिकनिहाय विमा संरक्षण,शेतकरी हिस्सा आणि अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे.ती पुढीलप्रमाणे आहे.**

मोसंबी – विमा संरक्षित रक्कम १ लाख रुपये प्रति हेक्टर,शेतकरी हिस्सा ८,५०० रुपये,अंतिम मुदत १४ जुलै २०२६,चिकू – विमा संरक्षित रक्कम ७० हजार रुपये, शेतकरी हिस्सा ५,९५० रुपये, अंतिम मुदत १४ जुलै २०२६,डाळिंब – विमा संरक्षित रक्कम १ लाख ६० हजार रुपये,शेतकरी हिस्सा ६,४०० रुपये,अंतिम मुदत १४ जुलै २०२६,लिंबू – विमा संरक्षित रक्कम ८० हजार रुपये, शेतकरी हिस्सा ६,८०० रुपये,अंतिम मुदत १४ जुलै २०२६.

पेरू – विमा संरक्षित रक्कम ७० हजार रुपये,शेतकरी हिस्सा ५,९५० रुपये,अंतिम मुदत १४ जुलै २०२६. सिताफळ – विमा संरक्षित रक्कम ७० हजार रुपये,शेतकरी हिस्सा ५,९५० रुपये,अंतिम मुदत १४ जुलै २०२६. द्राक्ष (क) – विमा संरक्षित रक्कम ३ लाख ८० हजार रुपये,शेतकरी हिस्सा १५,२०० रुपये,अंतिम मुदत १४ जुलै २०२६.हळद – विमा संरक्षित रक्कम १ लाख ८० हजार रुपये,शेतकरी हिस्सा ७,२०० रुपये,अंतिम मुदत १४ जुलै २०२६ आहे.

महसूल मंडळनिहाय अधिसूचित क्षेत्रे. मोसंबी : तुळजापूर,परंडा व वाशी तालुक्यातील सर्व महसूल मंडळे तसेच धाराशिव तालुक्यातील धाराशिव ग्रामीण, अंबेजवळगा,येडशी,पाडोळी,तेर,ढोकी, जागजी; कळंब तालुक्यातील शिराढोण, गोविंदपूर,नायगाव आणि भूम तालुक्यातील माणकेश्वर,वालवड,ईट व अंबी महसूल मंडळांचा समावेश आहे.

चिकू:परंडा,आसू,आनाळा,सोनारी, माणकेश्वर,तेर,ढोकी,जागजी,येडशी व अंबेजवळगे महसूल मंडळे अधिसूचित आहेत.डाळिंब,द्राक्ष (क),सिताफळ आणि

पेरू : जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळे योजनेसाठी अधिसूचित करण्यात आली आहेत.लिंबू : परंडा व भूम तालुक्यातील सर्व महसूल मंडळे,तुळजापूर तालुक्यातील सावरगाव,मंगरुळ,तामलवाडी आणि हळद पिकासाठी उमरगा तालुक्यातील बलसूर महसूल मंडळाचा समावेश करण्यात आला आहे.

अधिसूचित महसूल मंडळांतील शेतकऱ्यांनी प्रथम ग्रीस्टॅकअंतर्गत ऋग्रीशी खऊ तयार करून त्यानंतरच विमा योजनेत सहभाग नोंदवावा.अधिकाधिक शेतकऱ्यांनी विहित मुदतीपूर्वी ऋग्रीशी खऊ काढून योजनेचा लाभ घ्यावा. योजनेविषयी अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी झचऋध.सीं.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा जवळच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धाराशिव यांनी कळविले आहे.

# तृतीयपंथीयांसाठी बीज भांडवल योजना ;स्वयंरोजगारासाठी दोन लाखांपर्यंत कर्ज,अर्ज करण्याचे आवाहन

धाराशिव दि.१ जुलै (जिमाका) तृतीयपंथीय समाजघटकाची सर्वांगीण उन्नती व्हावी,त्यांना समाजाच्या मुख्य विकास प्रवाहात आणता यावे आणि त्यांच्या आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाला चालना मिळावी,या उद्देशाने शासनाने विविध कल्याणकारी उपाययोजना राबवल्या आहेत.त्याचाच एक भाग म्हणून तृतीयपंथीयांसाठी स्वयंरोजगार व व्यवसाय उभारणीसाठी बीज भांडवल योजना राबविण्यात येत असून,पात्र लाभार्थ्यांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,धाराशिव सचिन कवले यांनी केले आहे.

तृतीयपंथीय घटकांच्या विविध स्वरूपाच्या समस्या लक्षात घेऊन शासनाने १३ डिसेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय,प्रादेशिक तसेच जिल्हास्तरीय तृतीयपंथीय संरक्षण व कल्याण मंडळे स्थापन केली आहेत. त्यानंतर ७ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली.या माध्यमातून विविध शासकीय विभागांच्या योजनांचा लाभ पात्र तृतीयपंथीयांना निकषानुसार उपलब्ध करून देण्यात येत आहे.

तृतीयपंथीयांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या बीज भांडवल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना खालीलपैकी कोणत्याही एका कर्ज योजनेचा लाभ घेता येणार आहे.

लघु कर्ज योजना अंतर्गत २५ हजार रुपयांपर्यंत,मध्यम कर्ज योजना अंतर्गत ५० हजार रुपयांपर्यंत,तर दीर्घ कर्ज योजना अंतर्गत २ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या तिन्ही योजनांमध्ये लाभार्थींचा ५ टक्के हिस्सा,४५ टक्के शासन अनुदान आणि ५० टक्के रक्कम राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र तृतीयपंथीयांनी सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,धाराशिव यांच्या कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत,असे आवाहन सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

# प्रामाणिक सेवेचा गौरव! नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे यांच्या हस्ते सेवानिवृत्त सेवक रसूल शेख यांचा सन्मान



धाराशिव (प्रतिनिधी):धाराशिव नगर परिषदेचे नगराध्यक्ष कक्षातील सेवक रसूल शेख हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. जवळपास अनेक वर्षे प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यभावनेने सेवा बजावणाऱ्या रसूल शेख यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी नगरपरिषदेत भावनिक वातावरणात त्यांचा सत्कार करण्यात आला. नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे यांच्या पुढाकारातून आयोजित या सत्कार समारंभात रसूल शेख यांच्या सेवेला गौरविण्यात आले. नगरपरिषदेच्या वतीने नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे यांच्या हस्ते त्यांना शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. तसेच नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने अधिकारी सोनखेडकर आणि कार्यालय अधीक्षक तथा स्वच्छता अभियंता अभिजीत गोरे यांच्या हस्तेही त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, नगरपरिषदेच्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे योगदान महत्त्वाचे असते. अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करणे ही नगरपरिषदेची आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करून नव्या पिढीसमोर आदर्श निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्याची ही परंपरा पुढेही कायम ठेवण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गटनेते खलिफा कुरेशी, बांधकाम सभापती अभिजीत काकडे, शिक्षण सभापती प्रवीण माळी, नगरसेवक राहुल काकडे, कार्यालयीन अधीक्षक अभिजीत गोरे, मुख्य लेखापाल तनवीर जमादार, पाणीपुरवठा सहाय्यक अभियंता रोहित मुंडे, पिंटू गायकवाड,विनय बिसले, निवृत्त कर्मचारी कोरवी, तसेच नगरसेवक व नगरपरिषदेतील सर्व अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपूर्ण सेवाकाळात शांत, शिस्तबद्ध आणि कर्तव्यनिष्ठपणे जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या रसूल शेख यांच्या कार्याचा उपस्थितांनी गौरव केला. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी सर्वांनी शुभेच्छा व्यक्त करत त्यांना निरोगी, आनंदी आणि समाधानाचे जीवन लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

# जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक ३ जुलैला ; तक्रारी सादर करण्याबाबत कार्यपद्धती जाहीर

धाराशिव दि.१ जुलै (जिमाका) जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती, धाराशिव यांची एप्रिल ते जून २०२६ या कालावधीतील त्रैमासिक बैठक शुक्रवार,३ जुलै २०२६ रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचार,गैरव्यवहार अथवा अफरातफरीसंदर्भातील तक्रारी सादर करण्याची शासनाने निश्चित केलेली कार्यपद्धती जाहीर करण्यात आली असून,सर्व कार्यालय प्रमुख, अशासकीय सदस्य आणि नागरिकांनी याची नोंद घ्यावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक प्रशासकीय विभागाने जिल्हा हा घटक मानून संबंधित विभागातील वरिष्ठतम अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा दक्षता समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यामुळे कोणतीही तक्रार प्रथम संबंधित गठित समितीकडे दाखल करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोतांद्वारे शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार, गैरव्यवहार किंवा अफरातफर झाल्याचे पुरावे उपलब्ध असल्यास, संबंधित अधिकारी ज्या तालुक्यात कार्यरत आहे त्या तालुक्यातील तालुकास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे तक्रारदाराला तक्रार सादर करता येईल.भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारी व त्यासोबत सादर केलेल्या पुराव्यांमध्ये तथ्य आढळल्यास, संबंधित तक्रार ३० दिवसांच्या आत पुराव्यांसह तपासून संबंधित अधिकारी ज्या कार्यालयात कार्यरत आहे त्या कार्यालयासाठी परिच्छेद ८ नुसार गठित करण्यात आलेल्या जिल्हा दक्षता समितीकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारींवर जिल्हा दक्षता समितीने ९० दिवसांच्या आत निर्णय घेणे बंधनकारक आहे.चौकशीत संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी सकृतदर्शनी दोषी आढळल्यास, संबंधित शिस्तभंग प्राधिकरणाकडे आवश्यक अहवाल सादर करण्यात येईल. मात्र,जिल्हा दक्षता समितीकडे पाठविण्यात आलेल्या तक्रारीवर ९० दिवसांच्या कालावधीत कोणतीही कार्यवाही अथवा निर्णय झाला नाही, तर तक्रारदाराला संबंधित पुराव्यांसह आपली तक्रार जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे सादर करण्याचा अधिकार राहील.

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे अर्ज सादर करताना तक्रारदाराने तालुकास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे यापूर्वी सादर केलेल्या तक्रारीची छायाप्रत तसेच संबंधित पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान,जनतेच्या तक्रारी किंवा अभिकथने पुराव्यासह सादर करावयाची असल्यास ती संबंधित अधिकारी ज्या तालुक्यात कार्यरत आहे,त्या तालुक्यातील तालुकास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे सादर करावीत. तसेच संबंधित विभागाने किंवा तालुकास्तरीय समितीने तक्रारीवर कार्यवाही केली नसल्यास ती जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे सादर करता येणार आहे.

याबाबत सर्व कार्यालय प्रमुख, अशासकीय सदस्य तसेच सर्वसामान्य नागरिकांनी नोंद घेऊन शासनाने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार तक्रारी सादर कराव्यात,असे आवाहन करण्यात आले आहे.

# काटगाव शिवारातून पानबुडी मोटारीची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे फिर्यादी –सोमनाथ महादेव रोकडे, रा. काटगाव ता. तुळजापूर यांचे काटगाव शिवारातील शेत गट नं २८३ विहरीतील ७.५ एच पी टेकस्मो कंपनीची पानबुडी मोटार एकुण १९, २८५ किंमतीची अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली.

अशा मजकुराच्या फिर्यादी सोमनाथ रोकडे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.


## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **MOMIN SUMAYYA NISAR**
TO: **SUMAIYA FEROJ PALLA.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SUMAIYA FEROJ PALLA** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **MOMIN SUMAYYA NISAR.**
NEW NAME:- **SUMAIYA FEROJ PALLA.**
Address :- KHAJA NAGAR,SHAMS CHOWK, OSMANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 215524912465
Mob. No.-9822227208

---

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **DONGRE AASIYA BEGAM MUKHTAR AHEMAD**
TO: **ASIYA BEGAM DONGRE.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **ASIYA BEGAM DONGRE** . will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **DONGRE AASIYA BEGAM MUKHTAR AHEMAD.**
NEW NAME:- **ASIYA BEGAM DONGRE**
Address :- NEAR ZARIYA LAWNS,MILLY COLONY, OSMANABAD.
DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 537051156852
Mob. No.-8087008707

## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708
9284321472


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४


## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was :
**MOHAMMED FARIDUDDIN MOHAMMED YOUSUFUDDIN KAZI**
TO: **MOHAMMED FARIDUDDIN MOHAMMED YUSUFODDIN KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use
**MOHAMMED FARIDUDDIN MOHAMMED YUSUFODDIN KAZI** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **MOHAMMED FARIDUDDIN MOHAMMED YOUSFUDDIN KAZI**
NEW NAME : **MOHAMMED FARIDUDDIN. MOHAMMED YUSUFODDIN KAZI**
Address - Kazi Galli Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-265475214297
Mob.8806141974



सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649